| MHSO110041632022 | **<u>क्र.चौ.अर्ज क्र.६२५/२०२२</u>**<br>संस्कृती बनसोडे विरुध्द अमोल बनसोडे<br>**<u>निशाणी क्र. ३६ वरील आदेश</u>** |
|---|---|

प्रस्तुत अर्ज सामनेवाले यांनी त्यांचे विरुध्द सदरहु प्रकरणामध्ये दिनांक २५.०९.२०२४ रोजी त्यांचा उलटतपास घेणेचा अधिकार बंद करण्यात आला होता. त्यानंतर निशाणी क्र ३५ वरील आदेशाअन्वये उलट तपास नाहीचा आदेश सामनेवाला यांच्यावर दंड रक्कम रुपये १००० लादून बाजूला सारण्यात आला. परंतू सामनेवाला यांनी सदर आदेशाची पूर्तता न केल्यामुळे दिनांक १५.१२.२०२५ रोजी निशाणी क्र ३५ वरील आदेश व्हेकेट करण्यात आला. त्यानंतर प्रस्तुत अर्ज हा अंतीम युक्तीवादाकामी नेमण्यात आला. दिनांक १७.०९.२०२५ रोजी सामनेवाला यांनी निशाणी ३७ अन्वये चौकशी कामी मुदतीचा अर्ज दिला. सदर अर्ज त्यांना शेवटची संधी देवून मंजूर करण्यात आला. त्यानंतरही त्यांनी दिनांक ०४.०३. २०२६ रोजी व ०६.०४.२०२६ रोजी मुदतीचे अर्ज दिले. त्यावेळसही त्यांना शेवटची संधी देण्यात आली. असे असतांना ही सामनेवाला यांनी प्रस्तुत अर्जाअन्वये उलटतपास नाहीचा आदेश रद्द होवून मिळणेकामी विनंती केली आहे. त्याच अर्जावर अर्जदाराने तिचे म्हणणे देवून सदर अर्जास हरकत दर्शवीली आहे.

२. अभिलेखाचे अवलोनक केले असता असे दिसून येते की, सदर आदेश पारीत झाल्यानंतरही सामनेवाला न्यायालयात हजर होता परंतू त्याने जाणूनबुजून सदर अर्ज दिला नाही. सामनेवाला याचे कृत्य हे सदर अर्ज लांबणीवर टाकण्याच्या उद्देशाने केल्याचे स्पष्टपणे दिसून येते. परंतू अर्ज गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता सामनेवाले यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांचा अर्जदाराचा उलटतपास घेण्याचा अधिकार बंद करण्याचा आदेश रद्दबातल करून त्यांना उलटतपासाची संधी मिळणे न्यायोचित ठरेल. माझ्या मते सामनेवाले यांचा

प्रस्तुतचा अर्ज मान्य केल्यास अर्जदारांचे न भरून येण्यासारखे नुकसान होणार नाही. याउलट सामनेवाले यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास भविष्यामध्ये प्रकरणांची गुंतागुंत वाढण्याची शक्यता जास्त आहे. परंतू सामनेवाला यांनी केलेल्या उशीरामुळे सदर अर्जाचे कामकाज अंतीम युक्तीवादाकामी नेमलेले असतांना लांबणीवर पडले आहे. त्यामुळे सामनेवाला याच्यावर जास्तीत जास्त दंड लादणे न्यायोचीत होईल करिता मी खालील आदेश पारित करते :-

**आदेश**

सामनेवाले यांचा सदरहु अर्ज मजुंर करण्यात येतो. दिनांक २५.०९.२०२४ रोजी सामनेवाले यांचेविरूध्द त्यांचा अर्जदाराचा उलटतपास घेण्याचा अधिकार बंद करण्यात आल्याबाबतचा आदेश रद्द करण्यात येतो व सामनेवाला यांना अर्जदारांचा उलटतपास घेण्याची संधी देण्यात येते. सदरहु अर्जाचा खर्च म्हणुन सामनेवाले यांनी रक्कम रु. ३०००/- (रूपये तीन हजार मात्र) अर्जदारांना द्यावे.

Digitally signed by GAIKWAD MOHINI JANU
Date: 2026.04.21 15:01:31 +0530

(एम. जे. गायकवाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माळशिरस,
ता. माळशिरस, जि. सोलापूर.

दिनांक : २१/०४/२०२६